नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०८/१०/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

## ग्रामीण हद्दतील विसर्जन शांततेत पार

नागपूर ग्रामीण हद्दीत एकुण ६२६ देविचे विसर्जन शांततेत पार पडले. आज व उदया सुद्धा काही देविचे विसर्जन होणार आहे. जिल्हयात देविचे स्थापने पासुन आज पर्यंत कोणतेही अनुचित प्रकार रास गरबा दांडीया यामध्ये आढळुन आलेला नाही. वेळेच्या आत सर्व दांडीया ग्रामीण भागात बंद झालेले असुन चोख बंदोबस्त मा श्री. विजयकुमार मगर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात लावण्यात आलेला होता. ग्रामीण भागातील रामटेक, मौदा, केळवद, उमरेड, बुटीबोरी, सावनेर, काटोल, भिवापुर, कुही येथील सर्व देवि व दांडीया कार्यक्रम चांगल्या प्रकारे व वेळेच्या आत पार पाडले. गरबा कार्यक्रम मौदा हद्दीत एका रात्री वेळेच्या थोडा उशीरा चालल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्याने ठाणेदार मौदा यांचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे कडून चौकशी सुरू आहे. तसेच ग्रामीण भागात कोणत्याही पो.स्टे च्या हद्दीत रात्री वेळेपेक्षा जास्त वेळ गरबा चालु करण्याबाबत कधीही तक्रार नसून सर्व गरबा दांडीया कार्यक्रम हे वेळेच्या आतच बंद झालेले आहे. नागपूर ग्रामीण भागात नउरात्र काळात नियमांचे कार्यदेशीरपणे पालन करण्यात आले आहे. विसर्जन व नउरात्र दरम्यान ग्रामीण भागात सर्वत्र शांतता राहीली.

## चालकाचा खून करून पळवुन आणलेला ट्रक संशयावरून पकडला
## पारशिवनी पोलीसांची कार्यवाही

दिनांक ०८/१०/२०२२ चे ०५.०० वा. दरम्यान पो.स्टे. पारशिवनी येथील पोलीस गस्तीवरील पोउपनि पळनाटे हद्दीतील मौजा करंभाड शिवारातील करंभाड ते ईटगाव व खंडाळा(पारडी) टी पॉईंट वर पेट्रोलिंग करीत असता १२ चाकी ट्रक क्र. एमएच–४०/एन– ३२१० संशयास्पदरित्या उभा दिसल्याने चौकशी केली असता चालक नामे– सुनिल गामा भारव्दाज, वय ३१ वर्ष, रा. वलनी यास गाडीतील मालाबाबत विचारपुस केली असता त्याने उडवा उडवीचे उत्तर दिले व ट्रक तसेच त्यामधील मालाचे कोणतेही कागदपत्र पेश केले नाही. ट्रक चेक केला असता त्यामध्ये २५ टन वेगवेगळे साईजचे लोखंडी पाईप अवैद्यरित्या विनाकागदपत्राचे मिळुन आले. त्यास ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन ला आणले.

सदर प्रकरणामध्ये चौकशी दरम्यान मुळ ट्रक चालकाचे नाव चक्रधरसिंग रामसजीवन सिंग(मृतक), वय ४४ वर्ष, चंभारनाला जवळ, बाबाबुद्धाजी नगर कपील नगर नागपूर हा असून तो दि. ०७/१०/२०२२ रोजी दुपारी कळमेश्वर हद्दीतील " अपोलो पाईप" मधुन लोखंडी पाईप भरून अकोला जाण्यासाठी निघाला होता व रस्त्यात पो.स्टे. तळेगाव जिल्हा वर्धा हद्दीत सायंकाळी दरम्यान त्याचा खुन झाल्याचे ताब्यात घेतलेला आरोपी चालक नामे– सुनिल गामा भारव्दाज, वय ३१ वर्ष, रा. वलनी याने माहिती दिली. पोलीस स्टेशन ला पकडण्यात आलेल्या आरोपींनी त्याचा खुन करून तो चालवित असलेल्या ट्रक कि. २५,००,०००/–रू. व

त्यामधील २५ टन लोखंडी पाईप कि. २०,००,०००/—रू. असा एकुण ४५,००,०००/—रू. चा माल चोरी करण्याचे उद्देशाने त्याचा खुन करून ट्रक व माल चोरी करून पडुन गेलेले होते असे निष्पन्न झाले. त्यावरून सदर मुद्देमाल व आरोपी यांचेवर ४१(१)(ड) जाफौ प्रमाणे करण्यात आली असून पुढील कारवाई सुरू आहे.

वरील घटनेबाबत पोलीस स्टेशन तळेगाव जि. वर्धा व स्थानिक गुन्हे शाखा यांना माहिती दिलेली असून सदर ठिकाणी कलम ३०२ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असले बाबत माहिती मिळालेली आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. मुख्तार बागबान यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. राहुल सोनवणे, पोउपनि ज्ञानोबा पळनाटे, पोहवा मुदस्सर जमाल, पोना महेन्द्र जळितकर, पोशि रूपेश राठोड, महेश फुलझेले, चालक पोउपनि प्रमोद कोठे, चापोहवा संदीप बळेकर यांचे पथकाने पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर